महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.**
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/४४

# वृत्तपत्र निवेदन

## कारागीर (क) भरती प्रक्रियेत महानिर्मितीचे प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य
## उर्वरित प्रकल्पग्रस्तांची दुसरी निवड सूची लवकरच जाहीर होणार

राज्यातील वीज टंचाईवर मात करण्याचे दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) ने स्थापित क्षमतेत वाढ करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर वीज प्रकल्प विस्ताराचा कार्यक्रम हाती घेतला आहे. नवीन परळी, पारस, खापरखेडा, भुसावळ, तसेच चंद्रपूर व कोराडी येथे प्रकल्प उभारणीचे काम सुरु आहे. या प्रकल्पांसाठी आपली जमीन उपलब्ध करुन देणाऱ्या स्थानिक रहिवाश्यांच्या योगदानाची महानिर्मितीला निश्चितच जाणीव होती व यापुढे देखील राहील. अशा प्रकल्पग्रस्तांना महानिर्मितीच्या सेवेत जास्तीत जास्त प्रमाणात सामावून घेण्यासाठी महानिर्मितीतर्फे जाहिरात क्र. ०५/२००९ अन्वये कारागीर - क पदावर सुमारे १०७६ उमेदवारांची भरती करण्यासाठी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ही भरती प्रक्रिया राबविताना शासकीय संविधानिक व वैधानिक धोरणास अनुसरून कारागीर - क पदासाठी आय.टी.आय. धारक उमेदवारांची ट्रेड टेस्टही घेण्यात आली होती. दि. २७ जानेवारी २०१० रोजी महानिर्मितीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर निवडलेल्या १७७ उमेदवारांची फक्त पहिली सूची सध्या जाहीर करण्यात आली होती व त्यात फक्त प्रकल्पग्रस्त उमेदवारांचाच समावेश होता.

प्रकल्पग्रस्तांना महानिर्मितीच्या सेवेत सामावून घेण्यासाठी प्रकल्पग्रस्तांच्या संघटना स्थानिक प्रशासन व मुख्यालय येथे वारंवार निवेदने सादर करत आहेत. गेल्या महिन्यात पहिली निवडसूची जाहिर झाल्यानंतर चर्चेचा पर्याय खुला असतानादेखील महानिर्मितीच्या काही प्रकल्पस्थळी असामाजिक प्रवृत्तींनी अकारण हिंसक प्रतिक्रिया व्यक्त करुन कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान केले. महानिर्मितीने सर्व प्रकल्पग्रस्तांप्रती आपले सहानुभूतिपूर्वक धोरण वेळोवेळी चर्चेद्वारे जाहीर केले असताना व त्याप्रमाणे भरतीप्रक्रिया चालू असताना देखील अकारण हिंसक आंदोलनामुळे वीज प्रकल्प उभारणीच्या राष्ट्रीय कार्यात अडथळे निर्माण होत असून सरकारी मालमत्तेचे नुकसानदेखील होत आहे.

या पार्श्वभूमीवर महानिर्मितीतर्फे सर्व संबंधित प्रकल्पग्रस्तांना तातडीने पुन्हा स्पष्ट करण्यात येत आहे की, महानिर्मितीने सुरु केलेल्या निवडप्रक्रियेत महानिर्मितीच्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांनाच प्राधान्य दिले जाईल. **फेब्रुवारी महिनाअखेरीस किंवा मार्चच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होणाऱ्या दुसऱ्या व अंतिम सूचीत देखील ट्रेड टेस्ट उत्तीर्ण झालेल्या अन्य पात्र प्रकल्पग्रस्तांचा जास्तीत जास्त प्रमाणात समावेश असेल, हे महानिर्मितीतर्फे पुन्हा स्पष्ट करण्यात येत आहे.** तसेच जे प्रकल्पग्रस्त उमेदवार सध्या ट्रेड टेस्ट उत्तीर्ण झाले नसतील, अशा प्रकल्पग्रस्त उमेदवारांनादेखील महानिर्मितीमध्ये अप्रेंटिस किंवा तत्सम प्रशिक्षणार्थी म्हणून विद्या वेतनावर निवडण्यात येऊन व एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर त्यांची पुन्हा ट्रेड टेस्ट घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

मात्र हिंसक कारवाईमध्ये सहभाग आढळलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांना यापुढे सेवाभरतीसाठी पात्र धरले जाणार नाही, हे देखील महानिर्मितीतर्फे स्पष्ट करण्यात येत आहे.

---

दिनांक : २०/०२/२०१०.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक
आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.
धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**